# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

**॥, मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे-४११०१६**

**उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचे कार्यालय
बी.एस.एन.एल. बिल्डींग, १ ला मजला, शिवाजीनगर पोस्ट
ऑफिस शेजारी, शिवाजीनगर, पुणे - ४११००५
झोपुप्रा/सप्रा-२/जा.प्र./लोकमान्य कॉलनी/ ६८ /२०२०
दिनांक :- ०८/ ०१ /२०२०

## जाहीर प्रकटन

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) कलम ३ नुसार महाराष्ट्र शासन अधिसूचना झोपुयो २००४/प्र.क्र.२१३/झोपुसु १, दि.३०/६/२००५ अन्वये करणेत आलेली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३ (वाय) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन झोपडपट्टीधारकांची पात्रता निश्चित करुन त्याबाबतची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२) तयार करणेचे अधिकार उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झो.पु.प्रा., पुणे यांना प्रदान केलेले आहेत.

खालील परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद केलेल्या मिळकतीच्या ठिकाणी राहणा-या सर्व झोपडपट्टीवासीयांना या जाहीर प्रकटनाद्वारे कळविणेत येते की, प्रस्तुत मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेबाबतचा प्रस्ताव **मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, ए-१०१ निलायन फायनल प्लॅट नं.७०/६/१ सि.टी.एस.नं. ४७/६/१ कै.वी.आ.मोडक पथ, अभिनव शैक्षणिक संकुल जवळ, एरंडवणे, पुणे-४११ ००४** या विकसकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे कार्यालयाकडे दाखल केलेला आहे. उपअभियंता (वर्ग-१), झो.पु.प्रा., पुणे यांचेकडील पत्र क्र.झोपुप्रा/तां.२/झोपुयो/८९+९०कोथरुड/२६६३/२०१८, दि.२६/११/२०१८ नुसार परिशिष्ट-२ करणेकरीता प्रस्ताव प्राप्त झाला.

परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद मिळकतीवरील झोपडपट्टीत राहणा-या झोपडीधारकांचे या विभागामार्फत सर्व्हेक्षण करणेत आलेले असून पात्र व अपात्र झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२) या कार्यालयाने तयार केलेली आहे. सदर झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२) परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या मिळकतीवरील झोपडपट्टीमध्ये ठळक दर्शनी ठिकाणी तसेच सार्वजनिक ठिकाणी व या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दि. ०८/०१/२०२० रोजी प्रसिद्ध करणेत येत आहे. विषयांकीत मिळकतीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील प्राथमिक यादीत अपात्र ठरलेल्या झोपडीधारकांनी हरकत अर्ज दाखल केलेले नाहीत. तरी परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद मिळकतीवरील झोपडपट्टीत राहणा-या सर्व झोपडीधारकांनी प्रसिध्द होणारी अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२) पाहून आपले पात्रतेची खात्री करावी. तसेच पात्रता यादी या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहणेसाठीसुध्दा उपलब्ध आहेत.

त्याअर्थी, प्रस्तुत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंतिम पात्रता यादीत (परिशिष्ट-२) जे झोपडीधारक पात्र /अपात्र झाले आहेत त्या पात्र / अपात्र झोपडीधारकांबाबत अन्य व्यक्ती, इसम यांना आक्षेप नोंदविणेचे असेल तर त्यांनी आपले आक्षेप व हरकती पुराव्यासह उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडे लेखी स्वरुपात दाखल करता येईल. तसेच जे झोपडीधारक अंतिम पात्रता यादीमध्ये अपात्र ठरलेले आहेत त्यांनी त्यांच्या पात्रतेकरिता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३५(१) अन्वये मा.सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडे सदरची अंतिम पात्रता यादी दि.०८/०१/२०२० या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत कार्यालयीन वेळेत प्रथम अपील दाखल करता येईल.

मा.सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडून प्रथम अपिलावर निर्णय देणेत आलेनंतर उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३५(१अ) अन्वये निर्णयाच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा.विभागीय तक्रार निवारण समिती, जुने विधानभवन, पुणे यांचेकडे पात्रतेकरिता द्वितीय अपिल दाखल करता येईल. पात्रतेसंबंधात मा.विभागीय तक्रार निवारण समिती यांनी दिलेला निर्णय अंतिम राहिल.

## परिशिष्ट 'अ'

| मिळकतीचे ठिकाण | दाखल प्रस्तावानुसार योजनेचे एकूण क्षेत्र (चौ.मी) | एकूण झोपड्यांची संख्या | पात्र झोपडी-धारकांची संख्या | अपात्र झोपडीधारकांची संख्या | चतु:सिमा | विकसकाचे नाव व संपूर्ण पत्ता. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| सि.स.नं.१००७ व १००८, स.नं.८९ व ९०, लोकमान्य कॉलनी, कोथरुड, पुणे | १०८६५.७३ चौ. मी. | एकूण झोपड्यांची संख्या= ८०७ | एकूण पात्र = ५६५<br>निवासी पात्र = ५३३<br>बिगरनिवासी पात्र= २९<br>संयुक्त पात्र = ०३ | एकूण अपात्र = २४२<br>पैकी<br>निवासी अपात्र =२३४<br>बिगरनिवासी अपात्र = ०६<br>संयुक्त अपात्र = ०२ | **पूर्वेस** - रस्ता<br>**पश्चिमेस- स.नं.९२ व ९३**<br>**उत्तरेस** - रस्ता<br>**दक्षिणेस** - रस्ता | मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, ए-१०१ निलायन फायनल प्लॅट नं.७०/६/१ सि.टी.एस.नं. ४७/६/१ कै.वी.आ.मोडक पथ, अभिनव शैक्षणिक संकुल जवळ, एरंडवणे, पुणे-४११ ००४ |

स्थळ :- पुणे.
दिनांक :- ०६/०१/२०२०

**उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

**प्रत :-**

१) श्री. रविकिरण होनमुटे, सर्व्हेक्षक:- सदरचे जाहीर प्रकटन सि.स.नं.१००७ व १००८, स.नं.८९ व ९०, लोकमान्य कॉलनी, कोथरुड, पुणे या मिळकतीवरील झोपडपट्टीतील सर्व सार्वजनिक ठिकाणी, सर्वांचे निदर्शनास येईल अशा दोन ते तीन दर्शनी ठिकाणी, सर्व झोपडीधारकांना दिसेल, समजेल अशा रीतीने प्रसिद्ध करावे. उपरोक्त जाहीर प्रकटन प्रसिद्ध केलेचा पंचनामा करावा. जाहीर प्रकटन प्रसिद्धीचे छायाचित्र काढावे. उपरोक्त जाहीर प्रकटनाची विषयांकीत मिळकतीवरील झोपडीधारकांमध्ये जास्तीत जास्त ठिकाणी पारदर्शक पद्धतीने प्रसिद्धी करावी व केलेल्या कार्यवाहीचा परिपूर्ण अहवाल, पंचनामा, छायाचित्रासह माझे नावे टपालाद्वारे सादर करावा.

२) मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, ए-१०१ निलायन फायनल प्लॅट नं.७०/६/१ सि.टी.एस.नं. ४७/६/१ कै.वी.आ.मोडक पथ, अभिनव शैक्षणिक संकुल जवळ, एरंडवणे, पुणे-४११ ००४:- उपरोक्त जाहीर प्रकटनाची प्रत समाविष्ट करणेत आली असून उपरोक्त जाहीर प्रकटनाची प्रसिद्धी विषयांकीत मिळकतीवरील झोपडपट्टीमधील झोपडीधारकांमध्ये करणेत यावी.

३) श्री.भूषण राऊत, संगणक अधिकारी :- उपरोक्त जाहिर प्रकटन व अंतिम पात्रता यादी, झोपुप्राच्या वेबसाईट वर अपलोड करणेत यावी.